# ऋणनिर्देश

## ।। ऋणनिर्देश ।।

' आदिवासी जीवनाचे चित्रण करणा-या कादंब-यांचा अभ्यास ' ( ' महानदीच्या तीरावर ' आणि ' झेलझपाट ' यांच्या अनुषंगाने ) ही प्रबंधिका साकार होताना ज्यांनी मला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष बहुमोल सहकार्य केले त्यांचे प्रथम आभार मानणे व कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजते.

एम्.फिल् (मराठी) पदवी अभ्यासक्रमासाठी माझी निवड झाल्यानंतर प्रबंधिकेसाठी कोणता विषय निश्चित करावा याबद्दल मनात संदिग्धता निर्माण झाली होती. त्याचवेळी शिवाजी विद्यापीठात मराठी विभागातील प्रपाठक डॉ. विश्वनाथ शिंदे यांच्याशी केलेल्या चर्चेमधून माझा विषय निश्चित झाला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या विषयाकडे पाहाण्याची चिकित्सक व सौंदर्यग्राही दृष्टी मला लाभली. या प्रबंधिकेचे लेखन करताना त्यांनी मला अतिशय मोलाचे व योग्य मार्गदर्शन केले. त्यांचे ऋण शब्दात व्यक्त करणे कठीण आहे. मला सदैव त्यांच्या या ऋणात राहणेच आवडेल.

मला एम्.फिल् (मराठी) पदवी अभ्यासक्रमासाठी डॉ.नसिराबादकर आणि त्यांच्या विभागातील प्राध्यापकांच्या कमिटीने प्रवेश दिला त्यामुळे मी हे काम पुरे करू शकले, हे मी कृतज्ञतापूर्वक नमूद करते. या प्रबंधिकेच्या संशोधन कार्यासाठी शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराडचे प्राचार्य व्ही.ए. रानडे तसेच प्राचार्य सुहास साळुंखे यांनी प्रोत्साहन व मोलाचे सहकार्य दिले. त्यांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजते. डॉ. कुंदप, डॉ. घुमाळ, प्रा. भोसले, प्रा.कु.माने यांनीही वेळोवेळी सहकार्य केले याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

हे संशोधन करण्यासाठी शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराडचे ग्रंथपाल श्री. माळी, कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा येथील ग्रंथपाल श्री. पाटील, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कराडचे ग्रंथपाल श्री. भोसले, वेणुताई चव्हाण महाविद्यालय, कराडचे ग्रंथपाल श्री. डांगे, तसेच नगरवाचनालय सातारा आणि बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील संबंधीत ग्रंथपाल यांनी मला मोलाचे सहकार्य करून आवश्यक ग्रंथभांडार उपलब्ध करून दिले त्यांची मी अत्यंत ऋणी आहे.

या प्रबंधिकेचे काम करीत असताना माझे पती इंजिनियर माधव हिरवे, माझी मुले चि. श्रीनिवास, कु. उमाराणी व कु. अश्विनी तसेच माझे बंधू व औद्योगिक प्रशिक्षण संस्था माळेगावचे, प्राचार्य रघुवीर खटावकर आणि त्यांचे कुटुंबीय, माझी वयोवृध्द आई या सर्वांनी मला अमूल्य सहकार्य केले व प्रोत्साहनही दिले. पण ही माणसे घरचीच असल्याने त्यांचे आभार मानणे हा औपचारीकपणाच ठरेल.

वरील सर्व व्यक्ती व संस्था यांनी सहकार्य दिल्यामुळेच ही प्रबंधिका मला पूर्ण करता आली याची मला पूर्ण जाणीव आहे.

या प्रबंधिकेचे काम सौ. माधुरी कुलकर्णी यांनी अतिशय काळजीपूर्वक, सुबक व नेटकेपणाने टंकलिखित करून दिले तसेच श्री. नंदकुमार नूलकर यांनी सुबकरित्या बांधणी व छपाई केली याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

दिनांक : २७ मे, 1994.

सौ. रत्नप्रभा माधव हिरवे

****************